**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९६५/२०२०**
**शामराव वि. इराप्पा**
**निशाणी क्र.२४ लगत**

**फिर्यादीचा उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन.बी.बोडरे यांचेमार्फत सुरु–**

माझा शेतीचा व्यवसाय आहे तसेच व्याजाने पैसे देण्याचा व्यवसाय ही आहे. माझ्याकडे सावकारकीचा परवाना आहे व तो सन २०१४ मध्ये घेतलेला आहे. मी सदर प्रकरणात परवाना दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सावकारकीचा व्यवसाय करतो व माझ्याकडे त्याचा परवाना आहे असे फिर्यादीत नमुद केलेले नाही. माझी फिर्याद इंग्रजीत आहे. आमचा शेतीचा व्यवसाय वडिलोपार्जित आहे. माझ्या वडिलांची शेती काजड बोरी, ता. इंदापुर येथे होती. मी काजड बोरी येथील शेतीचा उतारा दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा दुर्गाप्पा याचे सुरेश शंकर पवार व राजू व्यंकटेश हे मित्र आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ते सर्व मुंबईत राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची व माझी डायरेक्ट ओळख नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची सुरेश पवार व राजू व्यंकटेश यांची ओळख आहे. मला माहित नाही की, सुरेश पवार व राजु व्यंकटेश हे व्याजाने पैसे देण्याचा व्यवसाय करतात. मला माहित नाही की, सुरेश पवार, राजु व्यंकटेश व माझा मुलगा यांचा एक ग्रुप आहे. मला माहित नाही की, माझ्या मुलाचा मुंबईत सावकारी व्यवसायाचा दबदबा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा मुंबईत सावकारकीचा व्यवसाय करतो. मला माहित नाही की, सुरेश पवार व राजू व्यंकटेश हे माझ्या मुलासाठी पैसे वसुलीचे काम करायचे किंवा कसे. मला माहित नाही की, सुरेश पवार व राजू व्यंकटेश हे सुद्धा माझ्या मुलाच्या नावाखाली सावकारकीचा व्यवसाय करतात किंवा कसे.

मी आरोपीला एक रकमी दहा लाख रुपये दिले होते. माझ्याकडे दहा लाख रुपये कसे जमा झाले याबाबत मी पुरावा दाखल करण्यास तयार नाही. मी

माझ्या सावकारी व्यवसायाचा हिशोब ठेवत असतो. हे म्हणणे खरे आहे की, व्यवसायातुन कोणाला पैसे दिले व कोणाकडून पैसे आले याचाही हिशोब ठेवतो. मी सदर व्यवसायाचे कागदपत्र दाखल करण्यास तयार आहे. मी नि.क्र.३६ वर दाखल केलेले हमीपत्र/पावती इंग्रजीत आहे. मला इंग्रजी वाचता लिहिता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.३६ वरील पावती वकिल साहेबांनी तयार केली आहे.

**आरोपीच्या विधीज्ञांच्या विनंती अर्जावरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (ए. एस. साटोटे)

दि.०९.०६.२०२६ ३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण